कळवा प्रभाग समिती कार्यालय,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
दिनांक :- ०८.०३.२०१०.

**मा. कळवा प्रभाग समितीची सभा**

**सभा सुचना क्रमांक -५, दिनांक - ०८.०३.२०१०**

**सभा क्रमांक १, दिनांक -११.०३.२०१०**

प्रति,
श्री/श्रीमती.................................,
सन्मा.सदस्य/सदस्या,
कळवा प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यात येते की, ठाणे महानगरपालिकेच्या कळवा प्रभाग समितीची सभा, **गुरुवार,दिनांक -११.०३.२०१०** रोजी, **सकाळी ११.३०** वाजता यशवंत रामा साळवी, ऑलिम्पिक साईज तरण तलाव, कळवा प्रभाग समिती सभागृहात **सभा सुचना क्रमांक -५,दिनांक - ०८.०३.२०१०** रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचारविनिमय करणेसाठी आयोजित करण्यात येत आहे.

कृपया सदर सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

**मा. अध्यक्ष महोदय, कळवा प्रभाग समिती यांचे आदेशान्वये.**

**प्रभाग अधिकारी,**
**कळवा प्रभाग समिती,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

**सभा सुचना क्रमांक - ५, दिनांक - ०८.०३.२०१० रोजीची विषयपत्रिका.**

| **प्र. क्र.** | **विषय** |
|---|---|
| १७३) | मा.कळवा प्रभाग समितीचे दिनांक - २८.०१.२०१० रोजीच्या सभेचे इतिवृत्तांत मंजूर करणे. |
| १७४) | प्र.क्र.५० मध्ये विविध स्थापत्य कामे करणे.(नगरसेवक निधी) |
| १७५) | प्र.क्र.५३ मधील मनिषानगर गेट क्र.२ ते हनुमान टेकडी रस्त्यापर्यंत गतीरोधक व शारदा सोसा. समोर गटारावर स्लॅब टाकणे.(नगरसेवक निधी) |
| १७६) | प्र.क्र.५५ मधील कल्याणीबुवा उदयानासमोर बेंच बसविणे व एन.एम.एम.इमारत क्र.३ व ४ दरम्यान पायवाटेवर पेव्हर ब्लॉक बसविणे.(नगरसेवक निधी) |
| १७७) | प्र.क्र.५६ मध्ये विविध ठिकाणी रस्त्याचे नामफलक बसविणे. (नगरसेवक निधी) |
| १७८) | प्र.क्र.५६ मधील नामदेव स्मृती परिसरात चेकर्ड टाईल्स बसविणे. (नगरसेवक निधी) |

| | |
|---|---|
| १७९) | प्र.क्र.५८ मधील पदपथाची किरकोळ दुरुस्ती करणे. (नगरसेवक निधी) |
| १८०) | प्र.क्र.९३ विटावा येथील बळीराम मोकाशी व्यायामशाळेशेजारी बेंच बसविणे. (नगरसेवक निधी) |
| १८१) | प्र.क्र.९६ मधील गोवर्धन चाळ परिसरात गटार व पायवाट करणे. (नगरसेवक निधी) |
| १८२) | प्र.क्र.५० मध्ये साईसागर इमारतीच्या परिसरात गटार बांधणे. (प्रभाग सुधारणा निधी) |
| १८३) | प्र.क्र.५५ मधील कळवा स्टेशन रस्त्यावरील मच्छी मार्केट ते रेल्वे कॉलनी पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे. (प्रभाग सुधारणा निधी) |
| १८४) | प्र.क्र.५५ मधील सहयाद्री सोसायटीतील रस्त्याचे डांबरीकरण करणे. (प्रभाग सुधारणा निधी) |
| १८५) | प्र.क्र.९२ सूर्यनगर मधील शनिवार पार्कच्या बाजूला साईवंदन व साईश्वर सोसा.च्या मागील बाजूस गटार व स्लॅब बांधणे. (प्रभाग सुधारणा निधी) |

**प्रभाग अधिकारी,**
**कळवा प्रभाग समिती,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

कळवा प्रभाग समिती कार्यालय,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.
दिनांक - ०८.०३.२०१०

## मा.अध्यक्ष महोदया यांच्या परवानगीने घेण्यात आलेली आयत्यावेळची प्रकरणे.

| | |
|---|---|
| १८६) | प्र.क्र.५६ मध्ये फायबर बेंचेंस बसविणे. (नगरसेवक निधी) |
| १८७) | कळवा प्रभाग समितीअंतर्गत येणा-या इमारतींची विद्युत वार्षिक निगा-देखभाल व दुरुस्ती करणे. |

कळवा प्रभाग समिती कार्यालय,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
दिनांक :- ११.०३.२०१०.

**मा. कळवा प्रभाग समितीची सभा**

**सभा सुचना क्रमांक -५, दिनांक - ०८.०३.२०१०**

**सभा क्रमांक -१, दिनांक -११.०३.२०१०**

प्रति,
श्री/श्रीमती....................................,
सन्मा.सदस्य/सदस्या,
कळवा प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यात येते की, ठाणे महानगरपालिकेच्या कळवा प्रभाग समितीची सभा, **गुरुवार,दिनांक -११.०३.२०१०** रोजी, **सकाळी ११.३०** वाजता यशवंत रामा साळवी, ऑलिम्पिक साईज तरण तलाव, कळवा प्रभाग समिती सभागृहात **सभा सुचना क्रमांक -५,दिनांक - ०८.०३.२०१०** रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचारविनिमय करणेसाठी आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचे इतिवृत्तांत पुढीलप्रमाणे :-

सदर सभेस खालीलप्रमाणे सन्मा. सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सौ. मनिषा महेश साळवी | - | मा. अध्यक्षा |
| २. | श्री. अशोक नारायण भोईर | - | सन्मा. सदस्य |
| ३. | श्री. उमेश काशिनाथ पाटील | - | सन्मा. सदस्य |
| ४. | श्री. मिलिंद भारत पाटील | - | सन्मा. सदस्य |
| ५. | श्रीमती.सुरेखा सुरेश खातू | - | सन्मा. सदस्या |
| ६. | ॲड. सौ.अनिता सुनील गौरी | - | सन्मा. सदस्या |
| ७. | श्री. दिनेश दाजी कांबळे | - | सन्मा. सदस्य |
| ८. | श्री. राजेश आत्माराम खारकर | - | सन्मा. सदस्य |
| ९. | श्री. सुभाष आत्माराम खारकर | - | सन्मा. सदस्य |
| १०. | सौ. प्रमिला मुकूंद केणी | - | सन्मा. सदस्या |
| ११. | सौ. अपर्णा मिलिंद साळवी | - | सन्मा. सदस्या |
| १२. | श्री. सचिन जयराज म्हात्रे | - | सन्मा. सदस्य |
| १३. | श्री. प्रभाकर मोतीराम पवार | - | स्विकृत सदस्य |
| १४. | श्री. किशोर काशिनाथ भोईर | - | स्विकृत सदस्य |
| १५. | श्री. हेंमंत आत्माराम खारकर | - | स्विकृत सदस्य |

सदर सभेस खालील प्रमाणे सन्मा.सदस्य अनुपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १६. | श्री. मनोज विठ्ठल लासे | - | मा. उप-महापौर |
| १७. | श्री. राजेन्द्र रमेश साप्ते | - | सन्मा. सदस्य |
| १८. | श्री. गणेश यशवंत साळवी | - | सन्मा. सदस्य |

**वंदे मातरम्‌ने सभेला सुरुवात करण्यात येते.**

* * * * *

**श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदया,सभा सुरु होण्यापूर्वी मी सांगू इच्छितो की, प्रत्येकवेळी सभेमध्ये अधिकारी उपस्थित नसतात. मागच्या सभेमध्ये सुलभ शौचालयाबाबत दोन दिवसांत काम सुरु करतो असे श्री. अहिरे यांनी सांगितलेले होते. परंतू अजूनही काम सुरु झालेले नाही. त्या त्या भागातील जनता याबाबत नगरसेवकांना दोष देत आहे. माझी विनंती आहे की ,अशावेळी ठोस पावले उचलणे गरजेचे आहे. मा.महासभेमध्ये असो, मा.कळवा प्रभाग समितीमध्ये असो अधिकारी उत्तरे जबाबदारीने देत नाहीत. याचा अर्थ असा होत नाही की, नगरसेवकांना काही कळत नाही.

मी पाहणी केली तेव्हा कळले की,तेथे गणेश नावाचा ठेकेदार आहे. याबाबत लेखी पत्रही दिलेले आहे परंतू लेखी पत्र देऊनही काम होत नाही म्हणजे काय समजायचे ? याबाबत मराठे साहेब उत्तर दया.

**श्री.मराठे - मा. सहा.आयुक्त :-**

मा. अध्यक्ष महोदया, मागच्या सभेमध्ये अहिरे यांनी प्रत्येक सदस्यांना समजावून सांगितले होते की, सुलभ शौचालयाची कामे का थांबली किंवा का रेंगाळली ? कालपासून आजच्या सभेसाठी मी त्यांना फोन लावतोय मात्र फोन लागत नाही. भिवापूरकर साहेबही बाहेर आहेत.

**श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदया,अधिकारी नाहीत मग सभा कशासाठी घ्यायच्या ? कोणीही अधिकारी उत्तरे दयायला नाही का ?

**श्री.नितीन पवार - कार्यकारी अभियंता :-**

मा. अध्यक्ष महोदया, सन्मा.सदस्य श्री.उमेश पाटील यांच्या प्रभागामध्ये निर्मल अभियान अंतर्गत शौचालयाचे बांधकाम सुरु करण्यांत आले होते त्याबाबत मी स्वतः त्यांचे सोबत जाऊन पाहणी केली होती. ४ सीट्स फक्त बांधलेले आहेत. अर्धवट स्थितीत काम आहे. मी अवसरमोल साहेबांना भेटलो. त्यानंतर अहिरेंना भेटलो. ते म्हणाले, ठेकेदाराला बिल मिळालेले नाही. बिलामध्ये तांत्रिक चुका असल्यामुळे बिले देणे बाकी आहेत. दोन दिवसांत बिल देऊन लगेच काम सुरु करणार असे मला अवसरमोल व अहिरे साहेबांनी सांगितले होते. हा विषय त्यांचेशी संबंधित असल्यामुळे या कामाबाबत त्यांना विचारणें योग्य होईल.

**श्री.राजेश खारकर -सन्मा.सदस्य :-**

पवार साहेब,फक्त सन्मा.सदस्य उमेश पाटील यांच्याच प्रभागात नाही तर सर्व सदस्यांच्या प्रभागात हीच स्थिती आहे. आम्हीही याबाबत तुमच्याशी वारंवार, रोज चर्चा करीत असतो. ज्यावेळी सभा लावतो तेव्हा अधिका-यांना याची कल्पना दिली जाते परंतू अधिकारी सभेत उपस्थित नसतील तर सदस्यांनी येऊन आरडाओरडाच करायचा का ? यावर कारवाई करीत नाही परंतू जनता आमच्याकडे मोर्चे आणते त्याचे काय ? त्यांना उत्तरे काय दयायची ?

**श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदया, पवार साहेब व मी पहाणी केली बरोबर आहे परंतू अधिका-यांचीही जबाबदारी आहे. तुम्ही विभागाचा सर्व्हे करता, तेथील कुटुंबांच्या सहया घेता व शौचालय तोडता. परंतू ते परत मुदतीत बांधून देण्याची जबाबदारी अधिका-यांची नाही का ? त्यासाठी पर्यायी व्यवस्था असली पाहिजे.

**श्री.नितीन पवार - कार्यकारी अभियंता :-**

मी सहा.आयुक्त यांना विनंती करतो की, एकदा उपनगर अभियंता अहिरे व सन्मा.सदस्यांची एकत्रित सभा लावावी. जी अर्धवट स्थितीतील कामे आहेत ती कधी पूर्ण होणार याबाबत त्यांच्यामार्फत कार्यक्रम दयावा.

**श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदया, आमचे म्हणणे आहे की, अगोदरप्रमाणे ही शौचालयेही ठाणे महानगरपालिकेमार्फत बांधून दयावीत असे माझे स्पष्ट मत आहे.

**श्री.नितीन पवार - कार्यकारी अभियंता :-**

मा. अध्यक्ष महोदया, जी शौचालये पूर्णपणे नव्याने बांधावयाची आहेत ती ठाणे महानगरपालिकेमार्फत बांधणार आहोत. त्यासाठी प्रस्तावाच्या कामाला सुरुवात केलेली आहे. परंतू जी कामे अर्धवट झालेली आहेत व त्याचे अर्धे पेमेंट एम.एम.आर.डी.ए.कडून केलेले आहे. अशी कामे त्यांच्यामार्फतच पूर्ण करावी लागतील.

**श्री.दिनेश कांबळे -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदया, हा विषय मा.स्थायी समितीमध्ये झालेला आहे. तेव्हा सांगण्यात आले होते की , ही अर्धवट असलेली कामे सुध्दा महापालिकेमार्फत करावी. तेव्हा महापालिकेमार्फत कशी करायची ते अधिका-यांनी ठरवावे.

**श्री.नितीन पवार - कार्यकारी अभियंता :-**

मा. अध्यक्ष महोदया,ही कामे एम.एम.आर.डी.ए.कडून करावयाची आहेत कारण अर्धे पेमेंट केलेले आहे व अर्धवट काम बाकी आहे. एम.एम.आर.डी.ए.कडून मंजूर झालेली कामे असल्यामुळे महापालिका त्यांना पेमेंट करु शकत नाही.

**श्रीमती. सुरेखा सु. खातू, सन्मा.सदस्या :-**

मा. अध्यक्ष महोदया, हे सर्व प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे होत आहे. प्रशासन ठेकेदारांना वेळेवर बिले अदा करीत नाही त्यामुळे पुढची कामे अर्धवट रहात आहेत. तांत्रिक अडचण कशी येते? अहिरे साहेब जुने-जाणते आहेत.

**श्री.मराठे - मा. सहा.आयुक्त :-**

मा. अध्यक्ष महोदया, मी आपणा सर्वांना विनंती करतो की, आपल्या सभेची विषयपत्रिका अधिका-यांना जाते. त्यांनी मी फोनही करीत असतो. उद्या मिटींग आहे तर एक दिवस आधी मी त्यांना सभेची जाणिव करुन देतो. तरी आपण पुन्हा एकदा विशेष सभा लावून अहिरे व ड्रेनेजचे भिवापूरकर साहेब यांना बोलावून घेऊ.

**श्री.राजेश खारकर -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदया, मागच्या वेळीही अशीच विशेष सभा लावली होती मात्र झाली नाही.

**श्री.दिनेश कांबळे -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदया, या विशेष सभेला अधिकारी कदाचित येतील परंतू प्रत्येक सभेला अधिकारी हजर पाहिजेत.

**श्री.मराठे - मा. सहा.आयुक्त :-**

मा. अध्यक्ष महोदया, १५ तारखेला ४ वाजता विशेष सभा लावू या.

**श्रीमती. सुरेखा सु. खातू, सन्मा.सदस्या :-**

मा. अध्यक्ष महोदया, माझ्या येथे काम करताना रेल्वेची परवानगी घेतली नाही. मागे खाजगी जागा होती त्याची परवानगी घेतली नव्हती त्यासाठी एक महिना गेला. तेथे खोदून ठेवले आहे. सिव्हरेजच्या घाणीमुळे तेथे डासांचे प्रमाणे वाढले आहे. काल हिर्लेकर साहेब मिटींगला येणार म्हणून नागरिक वाट पहात होते. आता नागरिकही घाबरले आहेत की हे काम होतय की नाही कारण पावसाळा जवळ आला आहे. नाल्याचे पाणी बांध असूनही आत येत होते आता बांध तोडलेला आहे तर काय होईल अशी भिती लोकांमध्ये आहे. परंतू अधिका-यांना लोकांना दिलासा दयायलाही वेळ नाही. मी आज सकाळी हिर्लेकरांना फोन केला तेव्हा म्हणाले मी इकडे येऊन गेलो मला तिकडे यायला वेळ नाही. दुसरे काम होते. असे अधिकारी वेळ देऊन पाळत नाहीत.

**श्री.दिनेश कांबळे -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदया,अधिका-यांना वेळेवर यायला सांगा कारण आमच्या पक्षाची मुख्यालयात सभा आहे. तेव्हा लवकर सभा लावा.

**श्री.मराठे - मा. सहा.आयुक्त :-**

मा. अध्यक्ष महोदया, १५ तारखेला दुपारी ३.३० वाजता विशेष सभा लावू या. हिर्लेकर, अवसरमोल, अहिरे या अधिका-यांना सभेमध्ये बोलावू या.

**मा.अध्यक्ष :-**

१५ तारखेला दुपारी ३.३० वाजता विशेष/तातडीची सभा बोलावण्यांत यावी.

**श्री.अशोक भोईर -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदया, श्री.गुणवंत पाटील व गोसावी साहेब यांनाही सभेमध्यें बोलावून घ्या. दुसरे म्हणजे कळव्यामध्ये मलनिस्सारणाच्या वाहिन्या टाकण्याचा प्रकल्प सुरु झाला आहे. एक काम सुरु असताना ते काम पूर्ण न करता दुस-या ठिकाणी कामाला सुरुवात करतात त्यामुळे प्रत्येक प्रभागामध्ये अर्धवट कामे करुन निघून जातात. त्या ठिकाणी कामावर लक्ष देणारे कोणीही नाही. सिव्हरेजचे अधिकारी/कर्मचारी काय करतात ? जे इंजिनिअर आहेत तेही ठेकेदारोबरोंबर साईटवर हजर नसतात. जे ठेकेदार दिले आहेत तेही साईटवर उपस्थित नसतात. मग कामाकडे कोणाचे लक्ष आहे ? खातू मॅडमच्या प्रभागात गुणसागर नगरामध्ये कामाचा बोर्ड माझ्या नावाचा लावला होता. यामुळे गैरसमज नागरिकांमध्ये व आमच्यामध्येही होतात. काहीवेळा संबंधित नगरसेवकाला माहितही नसते की काम सुरु झाले आहे. या प्रक्रिया थांबल्या पाहिजेत. सन्मा.नगरसेवक मिलींद पाटील व माझे नावाचा बोर्ड आहे तेथे काम सुरु आहे . तेथे खालच्या बाजूला संपूर्ण स्टोन पावडर टाकलेली दिसत होती. आर.सी.सी. टाकलेले नाही. मागच्यावेळी त्यांना याबाबत बोललो होतो परंतू आजही तेथे पहायला गेले तर लोखंड किंवा आर.सी.सी.मटेरियल कुठेंही टाकलेले दिसत नाही. अशाप्रकारे कामचुकारपणा करीत आहेत कारण ठेकेदाराने अनेक ठेकेदार नेमलेले आहेत. सन्मा.नगरसेविका प्रमिला केणी व माझ्या प्रभागात रस्त्याचे काम सुरु आहे परंतू एक महिना झाला १०० फुटही काम झालेले नाही. या ठिकाणी महापालिकेचा इंजिनीयर तेथे रहात नाही तोपर्यत कामे होणार नाहीत असे मला वाटते.

**श्री.राजेश खारकर -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदया, माझ्या प्रभागातही अशी परिस्थिती आहे की, तो रोड पावसाळयाआधि केला नाही तर लोकांना रहदारीसाठी मार्ग रहाणार नाही. रोडची खोदाई केली आहे तेथे फक्त दोन पाईप टाकून सिव्हरेजवाल्यांनी काम बंद केले आहे. डांबरचे काम करण्यासाठी ठेकेदाराला वर्कऑर्डर दिलेली आहे. ठेकेदाराने खडीही टाकलेली आहे परंतू सिव्हरेजवाले काम करीत नाहीत. ही वर्कऑर्डर कॅन्सल झाली तर ! याला जबाबदार कोण ? कारण आता मार्च महिना आहे. मला याचे उत्तर दया. आठ दिवसांत काम करतो असे नितीन पवार यांनी सांगितले होते.

**श्री.नितीन पवार - कार्यकारी अभियंता :-**

मा. अध्यक्ष महोदया, डांबरीकरणाचे काम आठवडयामध्ये पूर्ण करु. १५ तारखेला सभा लावली आहे त्यावेळी संबंधित अधिकारी येतील. ड्रेनेजचे काम आहे त्याबाबत त्यांना फोन करुन सांगतो की, लवकरात लवकर त्यांचे काम संपवा.

**श्रीमती. सुरेखा सु. खातू, सन्मा.सदस्या :-**

मा. अध्यक्ष महोदया, मुंबई पुणे मार्ग आहे त्याबाबत भिवापूरकर साहेबांनी मा.महासभेत मला सांगितले होते की, गेला जून २००९ त्यावेळचा पावसाळा संपला की आम्ही तेथे सिव्हरेजचे काम सुरु करणार आहोत. अजून काम काम सुरु नाही. आता परत सांगतील की पावसाळा जवळ आला आहे तरी आता काम होणार नाही. मग हा रस्ता सिमेंट कॉक्रीटचा होणार कधी ? सगळयात पाहिल्यांदा घेतलेला मागच्या बोर्डातील हा रस्ता आहे. अधिकारी लोकांना व्यवस्थित उत्तरे देत नाहीत त्यामुळे लोकही नाराज आहेत.

**श्री.अशोक भोईर -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदया,मागासवर्गीय निधीचे काय झाले ५०% दिला होता आता ५०% मिळाला आहे.

**श्री.नितीन पवार - कार्यकारी अभियंता :-**

मा. अध्यक्ष महोदया, मागासवर्गीय निधी १००% आला आहे. प्रस्तावाप्रमाणे कामे घेत आहोत.

**श्री.अशोक भोईर -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदया, आम्हांला ५०% निधीबाबत माहिती होंती परंतू अजूनपर्यंत आणखी ५०% निधी आलेला आम्हांला माहित नाही. जर अधिका-यांना माहिती आहे तर ती आम्हांला कळविणे गरजेचे आहे. पवार साहेब प्रत्येक नगरसेवकाला प्रत्येक विभागासाठी किती निधी आला आहे ते कळविले का ? पाण्याचा मागासवर्गीय निधी आला आहे ते कळविले का ?

**श्री.नितीन पवार - कार्यकारी अभियंता :-**

मा. अध्यक्ष महोदया, १०० % निधीबाबत मा.महासभेमध्ये निर्णय झालेला आहे. व तसे सर्क्युलर काढून आपल्याकडे १००% प्रस्तावही आलेले आहेत. आपले प्रस्ताव आले तर आपण पुढे पाठवून देऊ.

**श्री.दिनेश कांबळे -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदया,काही गोष्टी अधिका-यांनी नगरसेवकांना विश्वासात घेऊन जेवढया आणता येतील तेवढया केल्या पाहिजेत.

**सौ.अपर्णा साळवी -सन्मा.सदस्या:-**

मा. अध्यक्ष महोदया,कनिष्ठ अभियंता म्हणाले की, सध्या ५०% ची कामे घेतली आहेत.

**श्री.नितीन पवार - कार्यकारी अभियंता :-**

मा. अध्यक्ष महोदया, १००% निधी आलेला आहे तेव्हा सन्मा.सदस्यांनी प्रस्ताव दयावेत.

**मा. प्रभाग अधिकारी प्रकरण क्र. १७३ ते १८५ वाचून दाखवितात.**

| प्र. क्र. | विषय |
|---|---|
| १७३) | मा.कळवा प्रभाग समितीचे दिनांक - २८.०१.२०१० रोजीच्या सभेचे इतिवृत्तांत मंजूर करणे. |
| १७४) | प्र.क्र.५० मध्ये विविध स्थापत्य कामे करणे.(नगरसेवक निधी) |
| १७५) | प्र.क्र.५३ मधील मनिषानगर गेट क्र.२ ते हनुमान टेकडी रस्त्यापर्यंत गतीरोधक व शारदा सोसा. समोर गटारावर स्लॅब टाकणे.(नगरसेवक निधी) |
| १७६) | प्र.क्र.५५ मधील कल्याणीबुवा उदयानासमोर बेंच बसविणे व एन.एम.एम.इमारत क्र.३ व ४ दरम्यान पायवाटेवर पेव्हर ब्लॉक बसविणे.(नगरसेवक निधी) |
| १७७) | प्र.क्र.५६ मध्ये विविध ठिकाणी रस्त्याचे नामफलक बसविणे. (नगरसेवक निधी) |
| १७८) | प्र.क्र.५६ मधील नामदेव स्मृती परिसरात चेकर्ड टाईल्स बसविणे. (नगरसेवक निधी) |
| १७९) | प्र.क्र.५८ मधील पदपथाची किरकोळ दुरुस्ती करणे. (नगरसेवक निधी) |
| १८०) | प्र.क्र.९३ विटावा येथील बळीराम मोकाशी व्यायामशाळेशेजारी बेंच बसविणे. (नगरसेवक निधी) |
| १८१) | प्र.क्र.९६ मधील गोवर्धन चाळ परिसरात गटार व पायवाट करणे. (नगरसेवक निधी) |
| १८२) | प्र.क्र.५० मध्ये साईसागर इमारतीच्या परिसरात गटार बांधणे. (प्रभाग सुधारणा निधी) |
| १८३) | प्र.क्र.५५ मधील कळवा स्टेशन रस्त्यावरील मच्छी मार्केट ते रेल्वे कॉलनी पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे. (प्रभाग सुधारणा निधी) |
| १८४) | प्र.क्र.५५ मधील सहयाद्री सोसायटीतील रस्त्याचे डांबरीकरण करणे. (प्रभाग सुधारणा निधी) |
| १८५) | प्र.क्र.९२ सूर्यनगर मधील शनिवार पार्कच्या बाजूला साईवंदन व साईश्वर सोसा.च्या मागील बाजूस गटार व स्लॅब बांधणे. (प्रभाग सुधारणा निधी) |

**प्रकरण क्रमांक १७३ ते १८५ - सर्वानुमते मंजूर**

**मा. प्रभाग अधिकारी आयत्यावेळची प्रकरण क्र.१८६व १८७ वाचून दाखवितात.**

| | |
|---|---|
| १८६) | प्र.क्र.५६ मध्ये फायबर बेंचेस बसविणे. (नगरसेवक निधी) |
| १८७) | कळवा प्रभाग समितीअंतर्गत येणा-या इमारतींची विद्युत वार्षिक निगा-देखभाल व दुरुस्ती करणे. |

**श्री.दिनेश कांबळे -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदया, आयत्यावेळचे विषयांचा गोषवारा देण्यांत यावा. हे विषय आयत्यावेळचे आहेत की आयते आलेले आहेत याचा खुलासा व्हावा.

**आयत्यावेळचे प्रकरण क्रमांक १८६ ते १८७ - सर्वानुमते मंजूर**

**सौ.प्रमिला केणी -सन्मा. सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदया,खारकर कंपाऊंडमध्ये गाळे व गोडाऊन बांधायला घेतले आहेत. ते पक्के बांधायला घेतलेले आहेत तेव्हा सी.आर.झेड.मध्ये पक्के बांधता येतात का ? याबाबत मला माहिती हवी आहे. त्यांचेवर कारवाई का करीत नाही ?

**श्री.मराठे - मा. सहा.आयुक्त :-**

मा. अध्यक्ष महोदया, सी.आर.झेडमध्ये बांधकाम करणे चुकीचे आहे. तेव्हा आज पाहतो व कारवाई करण्यास सांगतो.

**श्रीमती. सुरेखा सु. खातू, सन्मा.सदस्या :-**

मा. अध्यक्ष महोदया, मी गेल्या वर्षभर ओरडते आहे की, माझ्या येथे ट्रक लागतात त्यामुळे लोकांना जाण्या-येण्यास त्रास होतो व बायकांची मंगळसुत्रे मारली जातात. त्यासाठी जॅमर हवा म्हणून अनेकदा सहा.आयुक्तांना सांगितले आहे. त्या दिवशी उपायुक्त श्री.बी.जी.पवार म्हणाले की, नौपाडा प्रभाग समितीमध्ये जॅमर आहे तो पाठवून देतो. तेव्हा जॅमर आपल्या समितीमध्ये आले आहेत का ?

**श्री.मराठे - मा. सहा.आयुक्त :-**

मा. अध्यक्ष महोदया, आपल्याकडे जॅमर आलेले नाहीत. नौपाडयावरुन येथे आणावे लागतील.

**श्रीमती. सुरेखा सु. खातू, सन्मा.सदस्या :-**

मा. अध्यक्ष महोदया, लवकरात लवकर जॅमर आणा आणि लावून टाका. मी ट्रकवाल्यांनाही विनंती केली होती की, येथे ट्रक लावू नका परंतू ट्रकवाले ऐकत नाहीत आणि ट्रकच्या मागे कचरा टाकला जातोय.

**सौ.अनिता गौरी -सन्मा. सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदया,माझ्या प्रभागातील दत्तवाडी येथे कचराकुंडी आहे ती पुढे न्यायची आहे ते कसे करता येईल ? किती दिवसांत सरकवता येईल ?

**श्री. दांडेकर, स्वच्छता निरीक्षक :-**

मा.अध्यक्ष महोदया, कचराकुंडी पुढे नेता येईल.

**श्री.मराठे - मा. सहा.आयुक्त :-**

दांडेकर, तिथे कोणाची हरकत आहे काय तेही पाहून घ्या.

**सौ.अनिता गौरी -सन्मा. सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदया, तेथील नागरिकांचीच मागणी आहे. भवानी व सी रॉकच्या मध्ये कचराकुंडी घ्या.

**सौ.अपर्णा साळवी -सन्मा सदस्या :-**

मा. अध्यक्ष महोदया,मुंबई-पुणे हायवे आहे त्या हायवेवर ठिकठिकाणी कच-याच्या गाडया लागतात ते योग्य आहे का ? कारण हा नॅशनल हायवे आहे. मागे वारंवार विनंती करुनही गाडया हलविल्या जात नाहीत फक्त इकडे-तिकडे लावतात. कुत्रे, कचरावेचक बायका कचरा पसरवून ठेवतात आणि नॅशनल हायवेच विद्रुपीकरण दिसते. तसेच त्यांच्या वेळेनुसार गाडया व डंपर येतात हा माझा स्पष्ट आरोप आहे. कचरावेचक बायकांचा उद्योग झाल्याशिवाय कचरा नेला जात नाही.

**श्री. दांडेकर, स्वच्छता निरीक्षक :-**

मा.अध्यक्ष महोदया, भाटीया गॅरेज येथील कचराकुंडी प्रत्येक दिवशी तीन वेळा उचलतो. कचरावेचक महिला आहेत त्या कचरा काढून, जमा करुन घेऊन जातात. कचरा गोणीमध्ये भरुन ठेवतात आणि नंतर घेऊन जातात. त्यांच्या सोयीनुसार आपण कचरा उचलत नाही.

**श्रीमती. सुरेखा सु. खातू, सन्मा.सदस्या :-**

मा. अध्यक्ष महोदया, प्रेमकुटीरच्या येथे आत्ता नेऊन दाखवते त्या कचरावेचक बायकांनी ७/८ बोचकी तेथे ठेवलेली आहेत. घेऊन जात नाहीत. एम.ई.सी.बी.च्या मोडक्या ट्रान्सफार्मरमध्ये ही बोचकी ठेवलेली असतात.

**श्री. दांडेकर, स्वच्छता निरीक्षक :-**

मा.अध्यक्ष महोदया, नंतर संध्याकाळी त्या बोचकी घेऊन जातात.

**सौ.अपर्णा साळवी -सन्मा सदस्या :-**

मा. अध्यक्ष महोदया, त्या बायकांना टाईम लिमिट दया.

**श्री.मराठे - मा. सहा.आयुक्त :-**

दांडेकर, त्या बोचकी नेत नसतील तर संबंधित एस.आय किंवा कामगारांना सांगा. सदर कचरावेचक बायकांना ताकिद दया की,ताबोडतोब बोचकी उचलली नाही तर येथे कचरा वेचून दिला जाणार नाही.

**श्रीमती. सुरेखा सु. खातू, सन्मा.सदस्या :-**

मा. अध्यक्ष महोदया, काही बायका गाडी एन.एम.एम,त्रीमुर्ती, सहयाद्री मध्ये येते त्या गाडीत कचरा वेचत असतात. त्यांना सांगा की कचरा विखरु नका,गोळा करुन ठेवा. बाजूच्या गटारात सर्व कचरा/घाण जाते व गटार तुंबते याबाबत वसंत पाटील किती घाण निघते ते सांगतील.

**श्री. दांडेकर, स्वच्छता निरीक्षक :-**

मा.अध्यक्ष महोदया, उद्याच त्यांना ताकीद देतो.

**श्रीमती. सुरेखा सु. खातू, सन्मा.सदस्या :-**

मा. अध्यक्ष महोदया,आपल्या वृक्ष प्राधिकरण विभागात माणसे कमी आहेत असा आरडाओरडा होत आहे. मात्र मध्ये मी फोन केला तेव्हा मला सांगितले की, दोन माणसे अतिक्रमण विभागात दिली आहेत व एक माणूस स्टेडियमला दिला आहे. मग कळव्यासाठी काय आहे ?

**श्री.मराठे - मा. सहा.आयुक्त :-**

मा. अध्यक्ष महोदया, आपल्याकडे वृक्ष प्राधिकरणला धावडे ऐवजी मोरे म्हणून आलेले आहेत. तरी ते ओळख करुन देतील.

**श्री.सुनील मोरे - वृक्ष प्राधिकरण विभाग :-**

मा. अध्यक्ष महोदया, माझे नांव सुनील मोरे. माझा मोबाईल क्र.९२२११३२९६६. मी मागील सव्वा वर्ष रजेवर होतो. मी पी.एच.डी करीत आहे. आत्ता माझ्याकडे कळवा,मुंब्रा व वागळे असे तीन विभाग आहेत. कळवा प्रभागामध्ये १७ कामगार होते त्यापैकी ५ कामगार अतिक्रमण विभागाकडे आहेत त्यामुळे आता १२ कामगार आहेत.

**श्री.मराठे - मा. सहा.आयुक्त :-**

मा. अध्यक्ष महोदया, मा.उच्च न्यायालयाला अनधिकृत बांधकामांबाबत सर्व्हे करुन जी माहिती सादर करावयाची आहे. त्या सर्व्हेसाठी हे कामगार तात्पुरत्या स्वरुपात घेतले आहेत. मार्चअखेरपर्यंत हे काम आहे त्यानंतर पावसाळयापूर्वी हे कामगार विभागात परत पाठविले जातील. जरी कामगार कमी असले तरी झाडांची छाटणीचे काम सुरु राहील. आपण भाडयाने कामगार घेऊ शकतो.

**सौ.अनिता गौरी -सन्मा. सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदया, दत्तवाडी परिसरामध्ये रस्त्यावर येणा-या झाडांच्या फादयांची छाटणी करा. पावसाळयापर्यंत थांबू नका. तेथे लॅम्प लावले आहेत त्यांचा लाईट फांदयांमुळे रस्त्यावर पडत नाही. दुसरा एक अर्ज दिला आहे तो चामुंडा कॉप्लेक्सच्या येथे झाड कटींग करावयाचे आहे. तेथे महापालिकेचा बोर्ड लावला आहे. झाडाच्या फांदया त्यावर आल्या आहेत. पुढे ते वृक्ष प्राधिकरण सभेमध्ये आले की नाही ? काही कळले नाही.

**श्री.सुनील मोरे - वृक्ष प्राधिकरण विभाग :-**

मा. अध्यक्ष महोदया, पाहणी करुन छाटणी करतो.

**सौ.अपर्णा साळवी -सन्मा सदस्या :-**

मोरे तुम्ही आत्ता आलात की मागच्या वर्षीही होतात. कारण मला आठवतयं तुम्ही असतानाच मी माझ्या प्रभागात वाळवी लागलेल्या एका झाडांबाबत बोलले होते. तेव्हा तुम्ही सांगितलं फोटो दया, अर्ज दया परंतू ते झाड एका रात्री पडलं व सुबोध गाडीवाल्याचं ४० ते ५० हजाराचं नुकसान झालं. पत्र मिळाले की शहानिशा करणे किंवा सर्व्हे करणे गरजेचे आहे. तसेच जागृती अपार्टमेंटमध्ये एक नारळाचे झाड पूर्णपणे वाकलयं. तिथे त्यांच्या महागडया गाडया पार्किंग केलेल्या असतात. आता हे झाड वा-याने वगैरे पडले तर त्याला कोण जबाबदार आहे ? तेथील लोक आम्हांला पत्र देतात. मग त्याची जबाबदारी आम्ही घ्यायची का ? माझा स्पष्ट आरोप आहे की, कोटयावधीचा निधी आहे पण कामकाज कसं चालतं, काय चालतं ही मला शंका आहे.

**श्री.मराठे - मा. सहा.आयुक्त :-**

मा. अध्यक्ष महोदया, मी आपल्या मताशी सहमत आहे. झाडांच्या फांदया छाटण्याची आमची जबाबदारी आहे. ही गोष्ट तुम्ही लक्षात आणून दिलीत तरी करु व आमच्या निदर्शनास आले तरीही करु. परंतू झाडे तोडतांना वृक्ष प्राधिकरण समितीला संपूर्ण अहवाल दयावा लागतो.

**श्री.राजेश खारकर -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदया, कळवा प्रभाग समितीच्या आवारामध्ये जी पोलीस चौकी बनविली आहे , ती कशासाठी ?

**श्री.मराठे - मा. सहा.आयुक्त :-**

मा. अध्यक्ष महोदया,सर्व महापालिकांना शासनाने पोलीस दिले आहेत. अतिक्रमण किंवा अन्य कामासाठी आपल्याला पोलीसांची मदत लागते त्यासाठी प्रत्येकवेळी पोलीसांशी पत्रव्यवहार करावा लागत होता. आता प्रत्येक प्रभाग समितीला १०-१० पोलीस दिले आहेत त्यांच्या बसण्यासाठी, त्यांना कपडे बदलण्यासाठी तात्पुरती व्यवस्था केलेली आहे.

**श्री.राजेश खारकर -सन्मा.सदस्य :-**

मराठे साहेब, मला अतिक्रमण म्हणजे काय व त्याचे प्रकार किती याबाबतची माहिती दया.

**श्री.मराठे - मा. सहा.आयुक्त :-**

मा. अध्यक्ष महोदया, अतिक्रमण म्हणजे रस्त्यामध्ये, फुटपाथवर, सार्वजनिक जागांवर, शासकीय जागांवर जी अनधिकृत बांधकामे होतात त्या आरक्षित जागांवर होणा-या बांधकामांना अतिक्रमण असे संबोधतात. त्याशिवाय फुटपाथवरील टप-या, हॉकर्स हे सगळे अतिक्रमणामध्ये येते.

**श्री.राजेश खारकर -सन्मा.सदस्य :-**

आतापर्यंत वांरवार तक्रारी करीत असताना तुम्ही वारंवार आम्हांला उत्तर देता की, जागा एम.आय.डी.सी.ॲक्वायर आहे. पंरतू त्या जागेवर होणा-या अतिक्रमणांना पाणीपुरवठा कोण करते?

**श्री.मराठे - मा. सहा.आयुक्त :-**

मा. अध्यक्ष महोदया, पाणीपुरवठा आपण करतो परंतू अनधिकृतपणे पाणीपुरवठा होत असेल तर अशा प्रकारचा पाणीपुरवठा खंडीत करण्यासाठी मी पाणी पुरवठा विभागाला २/३ पत्रं दिलेली आहेत.

**श्री.राजेश खारकर -सन्मा.सदस्य :-**

दि.१८.२.२०१० ला मी पत्र दिले आहे त्यावर काय कारवाई केली ?

**श्री.मराठे - मा. सहा.आयुक्त :-**

मा. अध्यक्ष महोदया, याबाबत धुमाळ  काय कारवाई केली ते सांगतील.

**श्री.धुमाळ -उपअभियंता (पा.पु.)**

मा. अध्यक्ष महोदया, पत्र दिल्यानंतर काही अनधिकृतरित्या घेतलेली कनेक्शन कट केली आहेत.

**श्री.सुभाष खारकर -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदया, यांना पत्र दिल्यानंतर किती कनेक्शन कट केली व कशा पध्दतीने केली याची संपूर्ण माहिती हवी आहे.

**श्री.राजेश खारकर -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदया, ज्या भागातील अनधिकृत बांधकामांची रितसर माहिती देतो त्यावर कारवाईच करीत नाही.  त्याचा करही वसूल केला जात नाही.  आमचं असं मत आहे की, या अनधिकृत बांधकामांना दंड लावून वसुली करा. पत्र देऊन महिना झाला परंतू महिनाभरात एकही कनेक्शन कट केलेले नाही असा आमचा आरोप आहे आणि आम्हांला उडवाउडवीची उत्तरे देऊ नका. एकही काम सांगितल्यानुसार होत नाही.  याचा अर्थ आम्ही काय समजायचा ? प्रत्येक वेळी एम.आय.डी.सी. ॲक्वायर म्हणजे काय ?

**श्री.मराठे - मा. सहा.आयुक्त :-**

मा. अध्यक्ष महोदया, मी सहा महिन्यांपासून पत्र दिलेली आहेत. एम.आय.डी.सी. प्लॅनींग ॲथॉरिटी असल्यामुळे त्या जागेवरील बांधकामांवर एम.आय.डी.सी.ने कारवाई करणे अपेक्षित आहे.

**श्री.सुभाष खारकर -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदया, परंतू त्यांना आपण पाणी पुरवठा करतो. ५०० कनेक्शन अनधिकृत आहेत व अधिकृत कनेक्शन घेणा-या लोकांना त्यामुळे पाणीपुरवठा होत नाही.

**श्री.राजेश खारकर -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदया, माझी विनंती आहे की, माझ्या प्रभागात जे लोक कर भरतात त्यांना योग्य तो पाणीपुरवठा होत नसून जे लोक अनधिकृतपणे रहात आहेत त्यांना पाणीपुरवठा होत आहे. यावर तातडीने कारवाई केली नाही तर मी कळवा प्रभाग समितीतील अधिका-यांच्या नावाने उपोषणाला बसणार आहे.

**श्री.मराठे - मा. सहा.आयुक्त :-**

तशी वेळ येणार नाही. धुमाळ साहेब सदरची कनेक्शन कट करा.

**श्री.राजेश खारकर -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदया, मी नावासहित यादी देऊ का ?

**श्री.मराठे - मा. सहा.आयुक्त :-**

धुमाळ साहेब, नावासहित यादी असेल तर कनेक्शन कट का करीत नाही ?

**श्री.धुमाळ -उपअभियंता (पा.पु.)**

मा. अध्यक्ष महोदया, शंकर मंदिर परिसरामध्ये अनधिकृत कनेक्शन आहेत.

**श्री.सुभाष खारकर -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदया, या भागामध्ये पूर्णपणे अनधिकृत पाणीपुरवठा होत आहे.

**श्री.राजेश खारकर -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदया, धुमाळ साहेबांना ४-५ वेळा फोन केल्यानंतर त्यांनी सांगितले की, पोलीस बंदोबस्त मिळत नाही.

**श्री.धुमाळ -उपअभियंता (पा.पु.)**

मा. अध्यक्ष महोदया, पोलीस बंदोबस्तासाठी अर्ज केला आहे ....

**श्री.मराठे - मा. सहा.आयुक्त :-**

धुमाळ साहेब, पोलीस बंदोबस्त आपल्याकडे उपलब्ध आहे. केव्हाही सांगा पोलीस देता येतील.

**श्री.राजेश खारकर -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदया, याबाबत लवकरात लवकर कारवाई झाली नाही तर मी उपोषणाला बसणार हे लक्षात ठेवा कारण अधिकृत लोकानां पाणीपुरवठा होत नाही अनधिकृत बांधकामांना पाणी पुरवठा होत आहे. अधिकृत बांधकामांकडून कर वसुली करता, बिल भरले नाही तर पाणी कट करता. आणि यांचे कनेक्शन कट होत नाहीत. मराठे साहेब म्हणतात, पोलीस बंदोबस्त आहे आणि धुमाळ साहेब म्हणतात पोलीस बंदोबस्त मिळत नाही. पोलीस बंदोबस्त मिळत नाही तेव्हा आम्हांला धुमाळ साहेब असेही म्हणाले होते की, मराठे साहेबांना विचारा.

**<u>श्री.मराठे - मा. सहा.आयुक्त :-</u>**

मा. अध्यक्ष महोदया, आपल्याकडे पोलीस बंदोबस्त उपलब्ध आहे. मालमत्ता कर वसुलीसाठीही आवश्यकता पडल्यास पोलीस दिले जातात. तेव्हा कनेक्शन कट करण्यासही पोलीस दिले जातील.

**<u>श्री.सुभाष खारकर -सन्मा.सदस्य :-</u>**

मा. अध्यक्ष महोदया, माझे पत्र मा.आयुक्तांना देखील गेलेले आहे त्यांचे तुम्हालाही उत्तर येईल.

**<u>श्री.राजेश खारकर -सन्मा.सदस्य :-</u>**

मा. अध्यक्ष महोदया, सांगितलेली कामे होणे एवढीच सदस्यांची विनंती असते.

**<u>श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-</u>**

धुमाळ साहेब, सन्मा.सदस्यांनी आपल्या विभागाला पत्र व माहिती दिलेली आहे आणि मी सुध्दा आपल्या विभागाला पत्र दिलेले आहे की, खारेगांव नाक्यावर हजारो लिटर पाणी वाया जात आहे. एक महिना झाला काहीही काम केलेले नाही. दुसरे म्हणजे खारेगांव नाका ते बुधाजी पाटील मार्ग हा रस्ता खोदलेला आहे. हे काम ठाणे महापालिकेने करायचे आहे की संबंधित ठेकेदार करणार आहे? बील मिळाले नाही अशी कारणे ठेकेदार सांगतो. तरी सदरचा रस्ता व्यवस्थित करुन घ्या.

**<u>श्री.धुमाळ -उपअभियंता (पा.पु.)</u>**

मा. अध्यक्ष महोदया,काम करुन घेतो.

**<u>श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-</u>**

मा. अध्यक्ष महोदया,खारेगांव स्मशानभूमीमध्ये भरणी चालू आहे. आमच्या भागात कोणीही यावे आणि भरणी करावी अशी परिस्थिती आहे.

**<u>श्री.मराठे - मा. सहा.आयुक्त :-</u>**

मा. अध्यक्ष महोदया, मी या भरणी संदर्भात अतिक्रमण उपआयुक्तांच्या पी.ए.शी बोललो आहे. त्यांनी डायरीमध्ये यासंदर्भात नोंद घेतली आहे.

**<u>श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-</u>**

मा. अध्यक्ष महोदया,मी याबाबत मा.उपमहापौरांशीही बोललो. तेही म्हणाले की मला काही माहित नाही. कुठल्याही परिस्थितीमध्ये स्मशानभूमीमध्ये त्याचे रुपांतर करावे लागेल.

मी मागच्या सभेमध्ये कोंडवाडयाविषयी प्रश्न विचारला होता. ते अधिकारी आहेत का ?

**<u>श्री.मराठे - मा. सहा.आयुक्त :-</u>**

मा. अध्यक्ष महोदया, कोंडवाडयाबाबत पर्वा आपण फोनवरुन बोललात. आज कोंडवाडा विभागाचे अधिकारी आले आहेत ?

**<u>श्री.दिवेकर - कोंडवाडा विभाग :-</u>**

मा. अध्यक्ष महोदया, माझे नांव दिवेकर. मी कोंडवाडा विभागाकडून आलो आहे.

**श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदया, माझ्या प्रभागामध्ये मोकाट जनावरे आहेत त्याबाबत तुम्ही काय करणार आहात ?

**श्री.दिवेकर - कोंडवाडा विभाग :-**

मा. अध्यक्ष महोदया, सदरची जनावरे पकडून बंद करण्याची कारवाई करण्यांत येईल. आजपर्यंत कळवा व खारेगांव येथून ८ जनावरे पकडून आणलेली आहेत. खारेगांव येथून १ व कळवा येथून ७ जनावरे पकडली आहेत. ७,१८५/- रु दंड वसुल केला आहे.

**श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदया, खारेगांव नाक्यावर तुम्हाला जनावेर रस्त्याच्यामध्ये, कडेला बसलेली दिसतील. संध्याकाळच्या वेळेस दररोज १५ ते २० दिवस सातत्याने या. त्या रस्त्यावर रहदारी असते, तेथे कामगार लोक उभे असतात. तेथे ही जनावरे रस्त्याच्या कडेला,मध्ये बसलेली असतात.

**श्री.दिवेकर - कोंडवाडा विभाग :-**

पाटील साहेब, मी रजेवर असल्यामुळे मला निरोप मिळाल्यानंतर मी काल आपल्या ऑफीसमध्ये आलो होतो परंतू तुम्ही नव्हता. मी दोन आठवडयात हे काम करतो.

**श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदया, प्रभागामध्ये कुत्र्यांची संख्याही वाढलेली आहे त्यांच्याबाबत काय ?

**श्री.दिवेकर - कोंडवाडा विभाग :-**

मा. अध्यक्ष महोदया, याबाबत पशु वैद्यकीय अधिकारी,वागळे इस्टेट यांचेकडे कळवावे लागेल.

**श्री.राजेश खारकर -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदया, वारंवार तक्रार करुनसुध्दा १ते ३६ एम.आय.डी.सीच्या जागेवर अनधिकृतपणे बांधकामे चालू आहेत. यावर ठाणे महापालिकेमार्फत कारवाई होऊ शकते का ? ही यादी मी आपल्या अतिक्रमण विभागातून घेतलेली आहे. त्यामध्ये सर्व नांवे खोटी आहेत. खरे बांधकामधारक वेंगळेच आहेत. तरी याबाबत शहानिशा आपल्या अतिक्रमण विभागाने करावी व याची माहिती मला पुढील सभेच्या आधि दयावी कारण विटावा प्रभाग क्रमांक ९२ आहे तो आम्ही बनविलेला नसून वस्ती वाढली असल्याकारणाने तो ठाणे महानगरपालिकेने बनविलेला आहे. तो पूर्ण एम.आय.डी.सी. ॲक्वायर असेल तर तेथे नगरसेवक का निवडून दिलाय ? याची माहिती दया. या भागात नगरसेवकांनी कोणती कामें करावी याबाबतही माहिती दया.

**श्री.मराठे - मा. सहा.आयुक्त :-**

मा. अध्यक्ष महोदया, शासनाचा आदेश आहे की, जी प्लॅनिंग ॲथॉरिटी आहे त्यांनी तेथे काम करावे. त्यामुळे ठाणे महानगरपालिका अनधिकृत बांधकामांची यादी तयार करुन त्यांच्याकडे पाठवते. आपण मा.आयुक्तांच्या सहीनेही त्यांना पत्र पाठविलेली आहेत. परवा मा.आयुक्तांच्या उपस्थितीत तिथल्या कार्य.अभियत्यांबरोबर सभा झाली. या अनधिकृत बांधकामांबाबत त्यांनी कारवाई घ्यावी असेही त्यांना सांगण्यांत आले....

**श्री.राजेश खारकर -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदया, मराठे साहेब ही आमची दिशाभूल तर नव्हे ना ! कारण या भागातून उक नगरसेवक म्हणून मी निवडून आलो आहे. मग महापालिकेच्या माध्यमातून काय कामे करावी हा प्रश्न आहे. तुम्ही एम.आय.डी.सी. ॲक्वायर सांगता आणि तेथे कामांसाठी निधीही उपलब्ध करुन देता. हा निधी कुठे वापरायचा ? तो निधी देऊ नका. आम्ही लोकांना सांगू की आपला भाग एम.आय.डी.सी. ॲक्वायर आहे त्यामुळे नगरपालिका निधी देऊ शकत नाही.

**श्री.मराठे - मा. सहा.आयुक्त :-**

मा. अध्यक्ष महोदया, त्या भागामध्ये असलेल्या लोकसंख्येला सुविधा पुरविण्याचे काम महापालिका करते.

**श्री.राजेश खारकर -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदया, या अनधिकृत बांधकामांना नगरपालिका कर वसुली करते, पाणी पुरवठा करते, गटार,लाईट या सुविधा महापालिका देते.मग हे का देता ? आणि मग अनधिकृत बांधकामांवर कारवाई का करु शकत नाही. पहाणी करुन एम.आय.डी.सी.ला कळवतो असे थातुरमातुर उत्तर देऊ नका. एम.आय.डी.सी. येईपर्यंत २/३ दिवसांत बांधकामे पूर्ण होतात. यावर काय करायचे ? दोन महिन्यापूर्वी कार्यकारी अभियंता होते, मराठे साहेब आपण होतात,पावसाळयानंतर जो नाला आपण बनविलेला होता तो बुजवून त्यावर अनधिकृत बांधकाम केलेले आहे. त्यावर कारवाई कोणी करायची ? आता पावसाळा तोंडावर आला आहे. जर उद्या तेथे हानी झाली तर मी कळवा प्रभाग समितीचे सहा.आयुक्त यांच्यामुळे ही हानी झालेली आहे असे सांगेन. कारण मी मागे तुम्हांला हे दाखवलेले आहे त्याचे माझ्याकडे फोटो आहेत. आम्ही तेथे गेल्यानंतर लोकांना काय उत्तरे दयायची ? यावर काहीतरी तोडगा काढा.

**श्री.मराठे - मा. सहा.आयुक्त :-**

